# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 29/07/2020 (बुधवार)

(सायंकाळ)

---

**पोस्टे कुही अंतर्गत टाकळी शिवारात जुगार अडयावर धाड**

**फॉरच्युनर कार सह 36,20,325/— रू. चा मुद्देमाल जप्त**

**स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामिण पोलीसांची कार्यवाही**

स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांना दिनांक 28/07/2020 रोजी मिळालेल्या गोपनिय माहिती नूसार काही इसम हे पोस्टे कुही हद्दीत टाकळी शिवारात सार्वजनिक ठिकाणी 52 तास पत्यावर हारजीतचा जुगार खेळत आहे. त्यानूसार पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखच्या पथकाने टाकळी शिवारात सार्वजनिक रहदारीच्या रस्त्यावर चालु असलेल्या जुगार अडयावर छापा घातला असता काही इसम 52 ताश पत्यावर पैशाची बाजी लाऊन हारजीतचा खेळ खेळतांना दिसून आले. पोलिसांना पाहून ते पळू लागलाच त्यांचा पाठलाग करून त्यांना ताब्यात घेण्यात आले. तर काही इसम हे पळून जाण्यात यशस्वी झाले. ताब्यात घेण्यात आलेल्या इसमाचे नाव 1) अनिल भैयाजी राउत, वय 41 वर्ष, रा. न्यूबीडीपेठ नागपूर 2) दिनेश वसंतराव चौधरी, वय 32 वर्ष, रा. आर्शिवाद नगर ,जि. नागपूर, 3) वैभव पूडंलीक कोरगे वय 20 वर्ष रा न्यू बीडीपेठ नागपूर 4) सूरज प्रसाद गायगवळी , वय 24 वर्ष रा जुनी बीडीपेठ नागपूर जि. नागपूर, असे सांगीतले.त्याचे ताब्यातून 1)नगदी रोख 12670/—रू, 2)52 तास पत्ते ,3) 04 मोबाईल संच, 4) 07 दुचाकी वाहने ,5) 02 चारचाकी वाहन ज्यामध्ये एक फॉरच्युनर कार व एक स्वीप्ट कार चा समावेश आहे अशाप्रकारे एकुण किं. 36,20,325/—रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी पो.स्टे. कुही येथे मीळनू आलेल्या तसेच पळून गेलेल्या आरोपीतांविरुध्द कलम 12 मुंबई जुगार कायदा.अंतर्गत सदर गुन्हा नोद करण्यात आला व पुढील कायदेशिर कार्यवाही कामी आरोपी व जप्त मूददेमाल पोस्टे कूही यांना .सूपुर्त करण्यात आला.

सदरची कार्यवाही श्री. राकेश ओला पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण व अप्पर पोलीस अधिक्षक श्रीमती मोनिका राउत नागपूर ग्रामिण यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरिक्षक श्री. अनिल जिट्टावार, सपोनि जितेंन्द्र वैरागडे, पोहवा मदन आसतकर, संतोष पंधरे, रमेश भोयर पोशि बालाजी साखरे, राधेश्याम कांबळे, चालक पोहवा भाउराव खंडाते यांनी पार पाडली.



## अपघातात मृत्यु

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 02 कि.मी. अंतरावरील मौजा तेलकामठी येथे दिनांक 28/07/2020 चे 20:00 वा. दरम्यान फिर्यादी याचे भाउ नामे– देवीदास नागोराव चाफेकर, वय 46 वर्ष, रा. तेलकामठी हे त्यांच्या एमएच–40/एक्स–3307 क्रमांकाच्या मोटरसायकलने तेलकामठी बस स्टाप कडुन सावनेर रोडने घराकडे जात होते. दरम्यान समोरून येणारा एमएच–40/बीएल–9696 क्रमांकाचा ट्रकचा चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मोटरसायकला धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक देवीदास चाफेकर हे ट्रकच्या चाका खाली आल्याने ते गंभीर जखमी होवून त्यांचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– पांडूरंग नागोराव चाफेकर, वय 48 वर्ष, रा. तेलकामठी ता कळमेश्वर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304(अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे.

## अवैधरीत्या धारदार व घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 1 कि.मी. अंतरावर मौजा सायखोड कोंढाळी येथे दिनांक 28/07/2020 चे 18.35 वा. दरम्यान आरोपी नामे – हेमंत गोविंदरावजी तेलंग, वय 31 वर्ष, रा. बेलोना ता. नरखेड जि. नागपूर हा स्वतः जवळ कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्‌देशाने विनापरवाना अवैधरीत्या हातात तलवार घेवुन गावात दहशत निर्माण करतांना मिळुन आला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोशि गणेश ताजने, पोस्टे. कोंढाळी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपिविरुध्द कलम 4, 25 भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोहवा पुरूषात्तम धोंडे 8788365210 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यु

1) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 15 कि. मी. अंतरावर गुमथळा येथे दि. 22/07/2020 चे 06.00 वा.दरम्यान योगेश देवाजी राउत, वय 20 वर्षे, रा. वडोदा याला चर्म रोगाचा त्रास असून त्या त्रासाला कंठाळून कोणाला काहीही न सांगता घरी कोणीही नसतांना घरी असलेले थिमेट विषारी औषध प्राशन केले. त्याची प्रकृती खराब झाल्याने त्याला उपचाराकरिता प्रथम पीएचसी गुमथळा व नंतर मेडीकल कॉलेज नागपूर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दि. 22/07/20 चे 06:00 वा डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. संबंधीत कागदपत्रावरून सदरचा मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सर तर्फे पोहवा राजेश माकडे, मेडीकल पोलिस बुथ, नागपूर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. मौदा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस शिपाई बोरकर 9049972920 हे करीत आहे.

2) पो.स्टे. खापा :– अंतर्गत मौजा खापा शिवार येथे दि. 24/07/2020 चे 19.30 वा. दरम्यान सुरेश खुबाळकर रा. खापा यांचे खापा शिवारातील असलेल्या शेतातील गोठयात देशी दारुच्या खाली बॉटल मध्ये शेतीचे फवारणी करण्याकीरता शेती उपयोगी विषारी औषध फवारणी भरुन ठेवली होती. सौ. सुंदरबाई भैय्यालाल धुर्वे(मृतक), वय 55 वर्षे, रा. खापा हिने दारु समजुन सदरचे विषारी औषध स्वतःच प्राशन केले. त्यामुळे तिची प्रकृती खराब झाल्याने तिला उपचारकामी प्रथम पीएचसी खापा, नंतर सावनेर व त्यानंतर मेयो हॉस्पीटल नागपुर येथे भरती केले असता ती उपचारा दरम्यान दि. 28/07/2020 चे 08.00 वा. मरण पावली.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस नाईक संजय दाभाडे, मेयो पोलिस बुथ, नागपूर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. खापा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक सुधीर राठोड हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर